सुधारीत कार्यालयीन परिपत्रक क्र. : ३१

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
दिनांक :     /१०/२०२४.

**विषय : वायरमन या ५ पदासाठी खातेअंतर्गत अर्ज.**

**संदर्भ : १) सन २०१३ चा मंजूर आस्थापना आराखडा ठराव क्र.४८, दि. ०२/०८/२०१३.**
**२) मा. संचालक मंडळ ठराव क्र. ०६, दि. १७/११/२०१८.**
**३) ॲडमिन विभागाकडील दि. २६/०६/२०२४ रोजीची मान्य बढती साखळी.**
**४) मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांचे दालनात दि. २७/०६/२०२४ रोजी झालेल्या बैठकीचा वृत्तांत व मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०५/०९/२०२४ रोजीचे आदेश / निर्देश.**
**५) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची आरक्षण टक्केवारी मान्य टिपणी दि. १०/१०/२०२४.**

परिवहन महामंडळाचे जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीचे अनुषंगाने वायरमन हे पद खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेबाबत संदर्भ क्र. ४ व ५ ने आदेशित करणेत आले आहे.

जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीनुसार वायरमन या पदाची वेतनश्रेणी १५३००-४८७०० (एस-२) अशी असून सदरचे पद वर्कशॉप विभागातील कायम कर्मचाऱ्यांकडून खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेकामी खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करणेत आली.

१. वायरमनचे लायसन्स आवश्यक
२. ईलेक्ट्रिकल कामाचा कायम पदावरील ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.
३. सेवाजेष्ठता.
४. हजेरी व सर्व्हिस रेकॉर्ड समाधानकारक.

वायरमन या ५ रिक्त पदांसाठीचे आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| अजा (SC) | अज (ST) | विजाअ (VJA) | भज-ब (NTB) | भज-क (NTC) | भज-ड (NTD) | विमाप्र (SBC) | इमाव (OBC) | साशैमाप्र (SEBC) | आदुघ (EWS) | खुला (OPEN) | एकुण Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३% | ७% | ३% | २.५०% | ३.५०% | २% | २% | १९% | १०% | १०% | २८% | १००% |
| १ | - | १ | - | - | - | - | १ | १ | - | १ | ५ |

उपरोक्त नमूद अटी शर्तीनुसार जे कर्मचारी वायरमन या पदासाठी पात्र असतील, अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे लेखी अर्ज कागदपत्रांसह महामंडळाच्या मुख्य इमारतीतील बारनिशी विभागात दि. ०४/११/२०२४ अखेर पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अर्ज सादर करणेसाठी सर्व साधारण अटी शर्ती खालीलप्रमाणे.

१. वायरमन या ५ पदासाठी अर्ज करणेस वर्कशॉप विभागातील कर्मचारी पात्र राहतील. अपूर्ण व कागदपत्रांची पुर्तता नसलेला अर्ज सादर करू नये, सादर केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
२. विभागीय बढती समिती मार्फत निवड.
३. पात्र अर्जदारांची परिक्षा व मुलाखत घेणेबाबतचा निर्णय सर्वस्वी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

४. वायरमन पदावर नियुक्त करावयाच्या कर्मचारी संख्येबाबतचा अंतीम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

५. या परिपत्रकाद्वारे नेमणूक करणे महामंडळावर बंधनकारक नाही.

६. दिव्यांग व अनुकंपा कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात दिव्यांग /अनुकंपा असलेबाबतचा उल्लेख करावा. तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांनी दिव्यांगत्वाचा दाखल अर्जासोबत सहपत्रित करावा.

७. विभागीय बढती समितीची शिफारस व वायरमन या पदासाठी महामंडळाचे आवश्यकतेनुसार नेमणूका करणेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

८. अर्जदार कर्मचाऱ्यांनी रू. २००/- पेटी कॅश विभागात भरून त्याबाबतची पावती अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. भरणा पावती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच काही कारणास्तव जाहिरात रद्द केल्यास महामंडळाकडून सदरची रक्कम परत दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(नितीन नार्वेकर)
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.